|| सत्फलाय सहकारिता ||

# शिवकृपा

## सहकारी पतपेढी लि.,मुंबई

नोंदणी क्र.: बी.ओ.एम./आर.एस.आर./एस./ १८६२ - १९८२

अध्यात्मातून आधुनिकतेकडे,
सहकारातून समृद्धीकडे...

एक एका साह्य करुं ।
अवघें धरुं सुपंथ ॥
-जगद्गुरु संत तुकाराम महाराज




## वार्षिक अहवाल

सन २०२४-२०२५

**मुख्य कार्यालय**

शिवकृपा भवन, प्लॉट नं. आर-२२५, टि.टि.सी. इंडस्ट्रियल एरिया, एम.आय.डी.सी., रबाळे, नवी मुंबई ४००७०१. ☎: ०२२ ६९२२ ११११

Website : https://shivkrupapatpedhi.com ● E-mail : admin@shivkrupa.in

## विद्यमान संचालक मंडळ



**श्री. गोरख तु. चव्हाण**
संस्थापक व अध्यक्ष



**श्री. चंद्रकांत श्री. वंजारी**
संस्थापक व उपाध्यक्ष



**श्री. शिरीष हिं. देशमुख**
संचालक



**श्री. नरहर वि. देव**
संचालक



**श्री. बाळासाहेब तु. मोहिते**
संचालक



**श्री. राजेंद्र वि. पवार**
संचालक



**श्री. हिंदुराव पां. कदम**
संचालक



**श्री. सुरेश दि. संकपाळ**
संचालक



**श्री. विजय दा. घोरपडे**
संचालक (दि. ०४/०४/२०२५ पर्यंत)
(दि. १४/०८/२०२५ पासून)



**श्री. संतोष ब. चव्हाण**
संचालक



**श्री. किशोर यो. माने**
संचालक



**श्री. ओमकार अ. भोसले**
संचालक



**श्री. रमेश पां. चव्हाण**
संचालक



**सौ. शुभांगी द. वंजारी**
संचालिका
(दि. १६/०५/२०२५ पर्यंत)



**सौ. पुनम उ. जगदाळे**
संचालिका



**श्री. प्रविण गो. पाटील**
तज्ञ संचालक



**श्रीमती स्मिता प्र. खराडे**
तज्ञ संचालिका
(दि. १४/०८/२०२५ पासून संचालिका)



**श्री. लक्ष्मण मा. फडतरे**
संचालक
(कर्मचारी प्रतिनिधी)



**श्री. राजेश न. शेटे**
मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा कार्यलक्षी संचालक



**श्री. सुदाम आ. जाधव**
सहा. महाव्यवस्थापक
(प्रशासन)



# अधिमंडळाच्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस सन २०२४-२०२५

**(फक्त सभासदांकरीता)**

सन्माननीय सभासद श्री/श्रीमती

आपणांस कळविण्यात येते की, आपल्या संस्थेच्या अधिमंडळाची ४३ वी वार्षिक सर्वसाधारण सभा **रविवार, दि. ०७ सप्टेंबर २०२५** रोजी सकाळी ९.३० वाजता **श्रीमती जानकीबाई कृष्णा मढवी मंगल कार्यालय, प्लॉट नं. १०, सेक्टर ५, चिंचवली गार्डन जवळ, ऐरोली, नवी मुंबई - ४०० ७०८.** येथे खालील नमूद केलेल्या विषयांच्या कामकाजासाठी आयोजीत केलेली आहे. तरी आपण या सभेस वेळेवर उपस्थित रहावे, ही नम्र विनंती.

## ❊ सभेपुढील विषय ❊

१) दिनांक 01 सप्टेंबर २०२४ रोजी झालेल्या अधिमंडळाच्या ४२ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दिनांक ३१ मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला वार्षिक अहवाल, लेखापरीक्षीत नफा-तोटा व ताळेबंद पत्रक यांना मंजूरी देणे.
३) सन २०२४-२५ या अहवाल सालातील नफा विभागणी व लाभांशास मंजूरी देणे.
४) सन २०२४-२५ मधील अंदाजपत्रकापेक्षा कमी-अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
५) सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाच्या वैधानिक /शासकीय लेखापरीक्षण अहवालाची नोंद घेणे.
६) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती देणे व नोंद घेणे.
७) संस्थेच्या मंजूर कर्जवसूली धोरणास अनुसरुन संचालक मंडळाने कर्जफेडीसाठी अक्षम ठरलेल्या सभासदांच्या कर्जावरील व्याज व वसूली खर्चात अंशत: सूट दिलेल्या रक्कमेस कार्योत्तर मंजूरी देणे.
८) महाराष्ट्र शासनाच्या ''सामोपचार परतफेड योजने'' अंतर्गत सन २०२४-२५ मध्ये सवलत देवून तडजोड केलेल्या थकीत कर्जखात्यांची नोंद घेणे.
९) सन २०२३-२०२४ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणाचा दोष दुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकांच्या निर्देशांची नोंद घेवून कार्यवाही करणे.
१०) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
११) सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाकरीता शासकीय लेखापरीक्षकांची नेमणूक करणे व त्यांचे शुल्क ठरविणे.
१२) संस्थेच्या विविध विभागांचे कामकाज धोरणास मंजूरी देणे.
१३) मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी निर्देशित केलेला सुधारित आदर्श उपविधी दुरुस्तीसह स्विकृत करणे.
१४) अधिमंडळाच्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१५) मा. अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

आपला नम्र

**राजेश न. शेटे**
मुख्य कार्यकारी अधिकारी तथा कार्यलक्षी संचालक,
संचालक मंडळाच्या अनुज्ञेने

स्थळ : मुंबई
दिनांक : २० ऑगस्ट, २०२५

## ❊ विशेष सूचना ❊

१) गणसंख्ये अभावी ही सभा तहकूब झाल्यास पोटनियमातील तरतूदीप्रमाणे सदर सभा त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्या तासाने घेण्यात येईल. या सभेला गणसंख्येचे बंधन राहणार नाही.
२) ज्या सभासदांना वार्षिक अहवाल/कामकाजासबंधी काही सूचना द्यावयाच्या असतील, अशा सभासदांनी त्या लेखी स्वरुपात संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयात दिनांक ३० ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५.00 वाजेपर्यंत सादर कराव्यात. आयत्यावेळी आलेल्या सूचना विचारात घेतल्या जाणार नाहीत.
३) संस्थेचा सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल पतपेढीच्या https://shivkrupapatpedhi.com या संकेतस्थळावर सभासदांच्या माहितीकरीता उपलब्ध आहे. आवश्यकता असल्यास नोटीस दाखवून अहवाल शाखा कार्यालयातून घेवून जावे.

# * ४३ वा वार्षिक अहवाल *

।। रामकृष्ण हरि ।।

**सन्माननीय सभासद बंधू- भगिनींनो,**

आपल्या संस्थेच्या अधिमंडळाच्या ४३ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये आपणा सर्वांचे हार्दिक स्वागत!

संचालक मंडळाच्या वतीने आपल्या संस्थेचा सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील कामगिरीचा अहवाल मी आपल्या समोर सादर करीत आहे.

सन २०२४-२५ हे आर्थिक वर्ष व्यवसायासाठी व कर्जवसूलीच्या दृष्टीने विशेष आव्हानात्मक होते. अशा प्रतिकूल परिस्थितीतही संचालक मंडळाने संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी घेतलेले अनेक धोरणात्मक निर्णय, सभासद व ग्राहकांना दिलेली दर्जेदार उत्तम सेवा, सभासद, ग्राहकांशी जपलेला ऋणानुबंध आणि सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी संस्थेप्रती दाखविलेला विश्वास, यामुळे संस्थेने रक्कम ₹ ५१२५.५८ कोटी इतका संमिश्र व्यवसाय केलेला आहे. संस्थेने अहवाल सालामध्ये कर्ज वितरणाबरोबर थकीत कर्जाची वसूली प्रभावीपणे केल्याने ढोबळ नफा ₹ ५२.८१ कोटी इतका झालेला आहे. यामध्ये संस्थेचे संचालक मंडळ, कर्मचारी, ठेव संकलन प्रतिनिधी तसेच सभासद, खातेदार व हितचिंतकांचा मोलाचा वाटा आहे, याचा सार्थ अभिमान वाटतो. हे आपणासमोर सादर केलेल्या ताळेबंदावरून दिसून येईल.

## * विशेष उल्लेखनीय बाबी *

### ₹ ५१२५.५८ कोटी संमिश्र व्यवसायाची संकल्पपूर्ती

अहवाल सालामध्ये संस्थेने ग्राहकांना दिलेली दर्जेदार सेवा, ग्राहकांशी जपलेला ऋणानुबंध आणि सभासद, ठेवीदार व हितचिंतक यांनी संस्थेप्रती दाखविलेला विश्वास, संचालक मंडळाने केलेले प्रयत्न, व्यवस्थापन व कर्मचारी यांनी घेतलेले परिश्रम यामुळे संस्थेने ३१ मार्च, २०२५ अखेर ₹ ५१२५.५८ कोटी संमिश्र व्यवसायाचा महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण केलेला आहे. ही बाब शिवकृपा परिवारासाठी अभिनंदनीय व अभिमानास्पद आहे.

### ₹ १०० कोटी पेक्षा अधिक संमिश्र व्यवसाय असणाऱ्या शाखा :-

संस्थेच्या एकूण १०२ शाखांपैकी संमिश्र व्यवसाय ₹ १०० कोटी व त्यापेक्षा अधिक असणाऱ्या एकूण ०६ शाखा, ठाणे ₹ १६९ कोटी , बोरीवली ₹ ११५ कोटी, हडपसर ₹ १०४ कोटी, सासवड ₹ १०३ कोटी, तसेच ३० जून, २०२५ अखेर कोरेगांव शाखा ₹ १०० कोटी, सातारा शाखा ₹ १०० कोटी आहेत. तसेच चालू आर्थिक वर्षात अजून किमान १० शाखा ₹ १०० कोटी व त्यापेक्षा अधिक संमिश्र व्यवसाय पार करण्याचा संचालक मंडळ, व्यवस्थापन, कर्मचारी व ठेव संकलन प्रतिनिधी यांचा मानस आहे.

### कर्मचारी वेतन करार :-

सन २०१७ ते २०२२ या कालावधीत संस्था व कर्मचारी संघटना यांच्यात करण्यात आलेल्या वेतन कराराची मुदत संपुष्टात आली होती. वेतन करार करण्याबाबत कर्मचारी संघटनेची मागणी होती. त्या अनुषंगाने दि. २३ जून, २०२४ रोजी ग. दि. माडगुळकर नाट्यगृह, पिंपरी-चिंचवड महानगर पालिका, आकुर्डी रेल्वे स्टेशन जवळ, आकुर्डी, पुणे येथे संचालक, अधिकारी, व सर्व कर्मचारी यांचा स्नेह मेळावा आयोजित केला होता. या कार्यक्रमामध्ये सन २०२४ ते २०२९ या कालावधीसाठी नवीन वेतन करारावर सर्व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत स्वाक्षरी करुन वेतन करार अंमलात आला. वेतन करारामध्ये सर्व घटकांचा विचार करुन, संस्थेने कर्मचाऱ्यांना भरघोस अशी पगार वाढ दिली आहे. त्याचबरोबर कर्मचाऱ्यांना विविध प्रकारच्या कर्ज सुविधा, विमा सवलती देण्यात आलेल्या आहेत. याप्रसंगी संस्थेचे सर्व कर्मचारी उपस्थित होते.

### अभिनंदनीय :-

**१.** संस्थेच्या बारामती शाखेचा स्थलांतर सोहळा दि.२६ ऑगस्ट, २०२४ रोजी ह.भ.प.श्री. प्रमोद महाराज जगताप उद्घाटक यांचे शुभ हस्ते, मा. श्री. महेश साहेबराव रोकडे, मुख्य कार्यकारी अधिकारी, बारामती नगर परिषद, बारामती व श्री. सुशिलकुमार चंपालाल सोमानी, अध्यक्ष, बारामती व्यापारी महासंघ, संचालक सोमानी ग्रुप ऑफ कंपनीज यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

**२.** संस्थेच्या ठाणे शाखेच्या कार्यालयाचे अंतर्गत सजावटीसह नुतनीकरण केलेल्या प्रशस्त व सुसज्ज कार्यालयाचा श्री सत्यनारायण पुजा व रुद्रशांती होम हवन करुन दि. ०३ मे, २०२५ रोजी शुभारंभ सोहळा संपन्न झाला.

**३.** संस्थेच्या काल्हेर शाखेचा स्थलांतर सोहळा दि.१२ जुलै, २०२५ रोजी मा. श्री. कृष्णकांत काशिनाथ कोंडलेकर यांच्या शुभहस्ते, प्रमुख पाहुणे सौ. आश्लेषा पंकज तरे सरपंच, ग्रामपंचायत काल्हेर यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

**सभासद, कर्मचारी व ठेव संकलन प्रतिनिधी पाल्यांचा (विद्यार्थी) गुणगौरव समारंभ :-**

संस्थेचे सभासद, कर्मचारी व ठेव संकलन प्रतिनिधी यांच्या मुलांना/पाल्यांना उत्तेजन देण्याचा संस्थेने नेहमीच प्रयत्न केलेला आहे. अहवाल कालावधीत माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शालांत परीक्षेत ७० टक्के पेक्षा जास्त गुण मिळविलेल्या व विविध विषयात पदवी संपादन केलेल्या गुणवंत मुलांचा/पाल्यांचा विभागनिहाय **''गुणगौरव समारंभ ''** आयोजीत करुन गौरव करण्यात आला.

## आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष -२०२५:-

संयुक्त राष्ट्र संघटना (UNO) यांनी २०२५ हे आंतरराष्ट्रीय सहकार वर्ष घोषित केले. त्याचे औचित्य साधून महाराष्ट्र शासन, सहकार विभाग व महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन यांनी संयुक्तरित्या सहकार दिंडी व शिर्डी येथे आंतरराष्ट्रीय सहकारी पतसंस्था परिषदेचे आयोजन केले होते. यावेळी सहकार दिंडीमध्ये विविध संस्थांनी सहभाग घेतला होता. आपल्या संस्थेनेही जगद्गुरु संत श्री. तुकाराम महाराज यांच्या **''एक एका साह्य करुं। अवघे धरुं सुपंथ ।।''** या सहकाराच्या मुलमंत्राचा चित्ररथावर जिवंत देखावा साकारुन सहकाराचा प्रसार करण्यासाठी सहभाग घेतला. शिर्डी येथे पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय सहकार परिषदेच्या सह प्रायोजकत्वाची जबाबदारी यशस्वीपणे पार पाडली. संस्थेच्या भव्य व आकर्षक चित्ररथामुळे सहकार दिंडी व परिषदेच्या कार्यक्रमात चैतन्य निर्माण झाले. तसेच सहकार क्षेत्रातील संस्थेच्या आदर्श कामाची असंख्य लोकांना माहिती झाली, त्यामुळे संस्थेचा नावलौकीक वाढण्यास मदत झाली.

## साप्ताहिक स्नेहदिन :-

दि. ३१ जानेवारी, २०२५ रोजी ठेवी व कर्जे यांचा एकूण रक्कम ₹ ५००० कोटींचा संमिश्र व्यवसाय पूर्ण करुन संस्थेच्या इतिहासातील Mile Stone ठरणारा एक महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण केला आहे. संस्थेच्या इतिहासातील Mile Stone ठरणाऱ्या या बाबीचे औचित्य साधुन संस्थेच्या व्यवसायाचे जोरदार मार्केटिंग व प्रसिध्दी करणेसाठी तसेच सभासद, ग्राहक व हितचिंतक यांचे प्रती आभार व्यक्त करणे, नवीन ग्राहक संस्थेशी जोडले जावेत, त्यांना संस्थेची माहिती व्हावी, जेणेकरुन संस्थेची व्यवसायवृध्दी होईल. या उद्देशाने संस्थेच्या सर्व शाखांमध्ये प्रत्येक सोमवारी **''साप्ताहिक स्नेहदिन''** साजरा करण्यात येत आहे. असेच विविध उपक्रम वारंवार राबविण्याचा संस्थेच्या संचालक मंडळाचा मनोदय आहे.

## शिवकृपा सहकार मॅरेथॉन :-

संस्थेचे सभासद, कर्मचारी, ठेव संकलन प्रतिनिधी व संस्थेचे संचालक या सर्वांचे आरोग्य सुदृढ राहावे. व्यायामाची आवड निर्माण व्हावी या करीता संस्थेकडून सन २०२३ पासून राज्यस्तरीय शिवकृपा सहकार मॅरेथॉन स्पर्धा आयोजित केली जात आहे. त्याप्रमाणे दि. २० ऑक्टोबर, २०२४ रोजी सातारा येथे शिवकृपा सहकार मॅरेथॉन - २०२४ चे आयोजन करण्यात आले होते. **'एक धाव शिवकृपासाठी' 'शिवकृपाची धाव सहकारासाठी'** या टॅग लाईनखाली राबविण्यात आलेल्या या वैशिष्टयपूर्ण उपक्रमात १३०० स्पर्धकांनी सहभाग घेतला होता.

सन २०२५-२६ या आर्थिक वर्षातही **'शिवकृपा सहकार मॅरेथॉन - २०२५'** चे आयोजन करण्याचा मानस असून या मॅरेथॉन मध्ये संस्थेचे जास्तीत जास्त सभासद, कर्मचारी व ठेव संकलन प्रतिनिधी तसेच संचालक यांनी सहभाग घ्यावा. त्यासाठी https://forms.gle/dqMmK5CY3qrta5WR9 या लिंकवर नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

## शिवकृपा सहकार क्रिकेट चषक :-

कर्मचाऱ्यांमध्ये खिलाडू वृत्ती, सांघीक भावना, खेळाची आवड वृध्दींगत व्हावी या दृष्टीने धायरी, पुणे येथे दि. ११ जानेवारी, २०२५ रोजी **'शिवकृपा सहकार क्रिकेट चषक - २०२५'** संस्था अंतर्गत क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेचे प्रथम वर्ष असतानाही संचालक, प्रशासकीय कार्यालय व दहा विभागीय कार्यालयातून एकूण १२ संघांनी या स्पर्धेत उत्स्फुर्त सहभाग घेतला. या स्पर्धेमध्ये संस्थेच्या सातारा विभाग संघ (सातारा रॉयल्स) यांनी प्रथम क्रमांकाचे पारितोषिक पटकावले.

## शिवकृपा क्रिकेट संघाची कौतुकास्पद कामगिरी :-

श्री कुलस्वामी को-ऑप. क्रेडीट सोसायटी लि. या संस्थेच्या वतीने जानेवारी २०२५ मध्ये आयोजित केलेल्या राज्यस्तरीय अंतर-पतसंस्था क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले होते. राज्यातील अनेक पतसंस्था त्या स्पर्धेत सहभागी झाल्या होत्या. त्या स्पर्धेत शिवकृपा क्रिकेट संघाने सर्व साखळी सामन्यासह अंतिम सामना जिंकत ऐतिहासिक विजय संपादन करुन **''श्री कुलस्वामी चषक २०२५''** वर आपले नाव कोरले. सर्व खेळाडू अधिकारी/कर्मचारी यांचे संस्थेच्या वतीने अभिनंदन केले. त्याचबरोबर भविष्यामध्ये शिवकृपाचे कर्मचारी अशीच खेळामध्ये कौतुकास्पद कामगिरी करतील अशी अपेक्षा व्यक्त करत शुभेच्छा दिल्या.

## श्रीमद्भगवद्गीता पठण :-

श्रीमद्भगवद्गीता पठण केल्याने आचरण, वर्तणूक, आचार विचार शुध्द होवून चांगले जीवन जगण्यास मदत होते. अध्यात्माला आधुनिकतेची जोड देत संस्थेचे अधिकारी, कर्मचारी तसेच ठेव संकलन प्रतिनिधी मोठ्या प्रमाणात Learn Geeta च्या माध्यमातून श्रीमद्भगवद्गीता पठण करीत आहेत. तसेच सर्व कर्मचारी, ठेव संकलन प्रतिनिधी, व्यसनमुक्त रहावेत ही संकल्पना शिवकृपाने स्विकारली आहे.

### शिवसखी सहकार मंडळ :-

पतसंस्था चळवळीतील महिलांचे योगदान व सक्षम सहभाग वाढविणे. आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक सक्षमता/ सबलीकरण, महिलांच्या उद्योजकतेस प्रोत्साहन देणे, महिलांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवण्यासाठी प्रशिक्षण देणे, स्त्री-पुरुष समानता, महिलांना आरोग्यविषयक जागृती व मार्गदर्शन करणेसाठी संस्थेने **''संकल्प शिवसखींचा, सहकारातून समृध्दीचा''** ही संकल्पना राबविली आहे. सहकारात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी **'शिवसखी सहकार मंडळ'** स्थापन केले आहे. वर्षभरात नवनवीत उपक्रम राबविण्यात येत आहेत.

### शाखा विस्तार व स्वमालकीच्या जागा :-

संस्थेच्या मार्च २०२५ अखेर एकूण १०२ शाखा असून, शाखांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्यासाठी १ प्रशासकीय कार्यालय, २ क्षेत्रिय कार्यालये यासह १० विभागीय कार्यालये कार्यरत आहेत. संस्थेच्या एकूण ११५ कार्यालयांपैकी ४४ कार्यालये स्वमालकीच्या जागेत कार्यरत आहेत. संस्थेची अधिकाधिक कार्यालये स्वतःच्या मालकीची असावीत यासाठी संचालक मंडळ सदैव प्रयत्नशील आहे.

संस्थेची प्रत्येक शाखा व्यावसायिक दृष्ट्या कार्यक्षम व नफा मिळविणारी असावी यासाठी संचालक मंडळाचे सतत प्रयत्न सुरु आहेत. त्यास अनुसरुन मालाड व दहिसर शाखा संस्थेच्या गोरेगांव व बोरिवली शाखेत विलीन करण्याचा निर्णय घेवून अहवाल सालात वाकड व पिरंगुट पुणे या दोन नवीन शाखा ग्राहकांच्या सेवेसाठी सुरु करण्यात आलेल्या आहेत. लवकरच या दोन्ही शाखांचे प्रशस्त व सुसज्य जागेत उद्घाटन सोहळे आयोजित करण्याचा मानस आहे.

### संचालक मंडळ व समिती सभा :-

अहवाल सालात १५ संचालक, २ तज्ञ संचालक, १ कर्मचारी प्रतिनिधी व १ कार्यलक्षी संचालक असे एकूण १९ संचालक कार्यरत होते.

संस्थेचे सर्व सभासद, ठेवीदार व कर्जदार यांचे हित सतत नजरेसमोर ठेवून तसेच वित्तीय क्षेत्रात सतत होणारे बदल व आर्थिक निकषांचा परिणाम याची संस्थेच्या संचालक मंडळाने नेहमीच योग्य ती काळजी घेतलेली आहे. संस्थेच्या गुणात्मक वाढीसाठी व नवीन आव्हानांना सामोरे जाण्यासाठी व्यापक दृष्टीकोन स्विकारुन संस्थेच्या व्यवसाय वृध्दीसाठी व नियोजनबध्द कामकाज करण्यासाठी अहवाल सालात संचालक मंडळाच्या एकूण ५२ सभा घेण्यात आल्या. सर्व सभांना बहुसंख्य संचालक उपस्थित होते. संस्थेचे सर्व संचालक सभासद, ग्राहक व कर्मचारी यांना सदैव मार्गदर्शन करतात व संस्थेच्या कामकाजात सहभागी होऊन कामकाजात गतिमानता राखण्याचा प्रयत्न करतात.

### मान्यवरांच्या भेटी :-

अहवाल सालात संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयाबरोबरच शाखा कार्यालयांना सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, क्षेत्रातील विविध मान्यवर, शासकीय अधिकारी तसेच संत महंतांनी सदिच्छा भेटी दिल्या. याप्रसंगी त्यांनी संस्थेच्या कामकाजाची पाहणी करुन माहिती घेतली. त्याचप्रमाणे संस्थेच्या कामकाजाचे आणि प्रगतीचे कौतुक करुन शुभेच्छा दिल्या व मार्गदर्शन केले त्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे.

### सामाजिक बांधिलकी :-

सामाजिक बांधिलकीचे भान ठेवून सहकार क्षेत्रात काम करण्याचे तत्व संस्थेने पाळले आहे. अहवाल वर्षात विविध क्षेत्रातील सामाजिक काम करणाऱ्या सेवाभावी विश्वस्त संस्थांना आर्थिक मदत करुन त्यांच्या सामाजिक कार्यास संस्था हातभार लावत आहे. जगद्गुरु संत श्री. तुकाराम महाराज यांनी ३५० वर्षापुर्वी **''एक एका साह्य करुं । अवघें धरुं सुपंथ ।।''** हा सहकाराचा मुलमंत्र दिला. जगद्गुरु संत श्री तुकाराम महाराज यांचे श्रीक्षेत्र देहू, येथे इंद्रायणीकाठी जागतिक किर्तीचे भव्य असे गाथा मंदिर उभारण्यात आले आहे. गाथा मंदिर परिवाराच्या वतीने अन्नपुर्णा भवन, सत्संग भवन, रुग्ण सेवा, गोशाळा, गुरुकुल आणि भक्तनिवास याद्वारे गरजू लोकांची सेवा करण्याचे सत्कार्य केले जात असून ३६५ दिवस अन्नदान केले जाते. गाथा मंदिर न्यासाच्यावतीने चालू असलेल्या विविध शैक्षणिक, सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमाच्या वाढीसाठी, उन्नतीसाठी संस्थेच्या सभासदांच्या माध्यमातून सन २०२३-२४ च्या लाभांश रक्कमेतुन ₹ ४०,८०,८७१/- रक्कमेची गाथा मंदिरास अमृतमयी भेट देण्यात आली. त्याचबरोबर सातारा येथे आयोजित करण्यात आलेल्या ग्रंथमहोत्सवास आर्थिक मदत केली आहे. पंढरपूर आषाढी पायीवारी करणाऱ्या भाविकांसाठी मोफत औषधोपचारासाठी वैष्णव चॅरीटेबल ट्रस्ट व माऊली चॅरीटेबल ट्रस्ट मुंबई, रामकृष्ण हरि सेवा मंडळ, भिमाशंकर ट्रस्ट, अनेक सार्वजनिक गणेश मंडळे इत्यादी समाज उपयोगी कामाकरीता संस्थेकडून आर्थिक मदत देण्यात आली आहे.

### प्रशिक्षण व कार्यशाळा :-

सहकार व बँकींग क्षेत्रात निरंतर होत असलेल्या नवनवीन सुधारणा विचारात घेता त्या पार्श्वभूमीवर संस्थेच्या कर्मचाऱ्यांमध्ये कामकाजात देखील सकारात्मक बदल अपेक्षित आहे. त्यासाठी कर्मचारी प्रशिक्षण ही अत्यंत आवश्यक बाब आहे. प्रशिक्षणावर करावा लागणारा खर्च हा भविष्यासाठी फायदेशीर गुंतवणूक आहे ही बाब लक्षात घेवून सर्व कर्मचाऱ्यांना योग्य ते प्रशिक्षण देण्याचे संस्थेचे धोरण आहे. संस्थेचे कोरेगांव येथे स्वमालकीचे अद्ययावत व परिपुर्ण निवासी प्रशिक्षण केंद्र कार्यरत आहे.

संस्थेच्या निवासी प्रशिक्षण केंद्राच्या जागी नवीन इमारत बांधकाम करुन शाखा, विभागीय कार्यालय, प्रशिक्षण केंद्र व प्रशिक्षणार्थीसाठी निवासाची व्यवस्था करण्याची प्रक्रिया सुरु आहे. कर्ज वितरण, कर्ज वसूली, दस्तऐवज/कागदपत्रे पुर्तता व महत्त्व, एम.आय.एस. प्रणाली व विपणन, व्यक्तिमत्व विकास व संगणक कोअर बँकींग प्रणाली अशा विविध विषयावर अहवाल कालावधीत वेळोवेळी प्रशिक्षण कार्यक्रम-कार्यशाळा आयोजित करण्यात आल्या आहेत.

संस्थेच्या कर्मचाऱ्यांना दर्जेदार प्रशिक्षण मिळावे या हेतूने प्रशिक्षण देण्यासाठी विविध क्षेत्रातील अनुभवी व तज्ञ व्यक्तींना निमंत्रित करण्यात येते. तसेच महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., पुणे या शासन मान्यता प्राप्त संस्थेच्या माध्यमातून देखील संस्थेच्या संचालक, अधिकारी, कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिले जाते.

### चिंतन व प्रशिक्षण शिबीर :-

संस्थेचे मा. पदाधिकारी, संचालक व अधिकारी यांचे १३ ते १५ एप्रिल, २०२५ या कालावधीत गाथा मंदीर, श्रीक्षेत्र देहू, पुणे. येथे संयुक्त चिंतन व प्रशिक्षण शिबीर घेण्यात आले. या शिबीराचे उद्घाटन मा.श्री. शैलेश कोतमिरे, सेवा निवृत्त सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे शुभहस्ते झाले. या कार्यक्रमास मा.श्री. राजेश जाधवर अपर निबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षक), महाराष्ट्र राज्य, पुणे. ह.भ.प. गुरुवर्य श्री. पांडुरंग महाराज घुले, अध्यक्ष, गाथा मंदिर न्यास, श्रीक्षेत्र देहू, पुणे. तसेच ह.भ.प.श्री. प्रमोद महाराज जगताप यांनी उपस्थित राहुन मोलाचे मार्गदर्शन केले. तसेच त्यांच्या उपस्थितीत संपलेल्या आर्थिक वर्षाच्या कामकाजाचा आढावा व सन २०२५-२६ या आर्थिक वर्षाच्या कामकाजाचे नियोजन करण्यात आले. या चिंतन शिबीरामुळे संस्थेच्या कामकाजामध्ये एकसुत्रीपणा व गतिमानता येऊन उद्दिष्ट पूर्ण करणे शक्य होत आहे.

### स्नेहसंवर्धन :-

सभासद हा संस्थेचा मुलभूत घटक आहे तर संचालक, ठेवीदार, ग्राहक, कर्मचारी व प्रतिनिधी हे संस्थेचे पोषक घटक आहेत. या सर्वांच्या डोळस वृत्तीमुळे संस्थेचा कारभार पारदर्शक होण्यास मदत होते. या सर्वांनी केलेल्या सहकार्यामुळेच संस्थेची प्रगतीच्या दिशेने वाटचाल सुरु आहे. या सर्वांच्या मध्ये सुसंवाद व समन्वय साधून स्नेह वृध्दिंगत होण्यासाठी संस्थेच्या सर्व शाखांमध्ये अहवाल सालामध्ये विविध उपक्रमांचे आयोजन केले होते. यामध्ये दिनांक २२ नोव्हेंबर, २०२४ रोजी वर्धापनदिनाचे औचित्य साधून सभासद, ठेवीदार, खातेदार व हितचिंतक ग्राहकांसाठी स्नेहसंवर्धन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

### जागतिक महिला दिन :-

जागतिक महिला दिनाचे औचित्य साधुन दि. ०७ मार्च २०२५ रोजी संस्थेच्या सर्व शाखा कार्यालयामध्ये **''महिला दिन''** आयोजित करण्यात आला. सदर कार्यक्रमास संस्थेच्या सर्व शाखांमध्ये ७७६९ पेक्षा अधिक महिला उपस्थित होत्या. या उपक्रमाद्वारे संस्थेच्या कामकाजाबाबत महिला सभासद व ग्राहक यांच्या सुचना व कल्पना समजून घेणे शक्य झाले. त्यानुसार कामकाजामध्ये सुधारणा करण्यात आल्या. महिला दिनानिमित्त संस्थेच्या संमिश्र व्यवसायात रक्कम ₹ ५४.५५ कोटी एवढी वाढ झाली आहे. महिला मेळाव्यास उपस्थित महिला सभासदांना संस्थेच्यावतीने श्रीमद्‌भगवद्‌गीता, हरिपाठ व तुळशीचे रोप भेट म्हणून देण्यात आले. त्या अनुषंगाने महिला सभासद श्रीमद्‌भगवद्‌गीता पठण उपक्रमामध्ये सहभाग घेत आहेत. आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमित्त सहकार चळवळीत महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी संस्थेने **''संकल्प शिवसखींचा, सहकारातून समृध्दीचा''** ही संकल्पना राबविली आहे. तसेच सहकारात महिलांचा सहभाग वाढविण्यासाठी **'शिवसखी सहकार मंडळ'** स्थापन केले आहे.

### कर्मचारी वृंद :-

संस्थेच्या सातत्यपूर्ण प्रगतीमध्ये व्यवस्थापन, अधिकारी व कर्मचारी वर्गाचा सहभाग उल्लेखनीय असा राहिलेला आहे. संस्थेतील अंतर्गत कामकाजाची पुर्तता करण्याकरीता कर्मचाऱ्यांना त्यांच्या गुणवत्तेनुसार कामाची विभागणी करुन जबाबदारी देण्यात आल्यामुळे संस्थेच्या अंतर्गत कामकाजाचा दर्जा उंचावला आहे.

अहवाल सालात संस्थेच्या सेवेत १ मुख्य कार्यकारी अधिकारी, १ महाव्यवस्थापक, १ सहा. महाव्यवस्थापक, १० प्रशासकीय विभाग प्रमुख, २ क्षेत्रिय व्यवस्थापक, १० विभागीय व्यवस्थापक, १० विभागीय कर्ज वसूली व्यवस्थापक, १० विभागीय शाखांतर्गत तपासणी व्यवस्थापक, १०२ शाखा व्यवस्थापक, ५३ इतर व्यवस्थापक, १४३ क. अधिकारी, ५१० सहा. अधिकारी, २२ शिपाई/वाहन चालक, असे एकूण ८७५ कर्मचारी आपले काम कर्तव्य भावनेने पार पाडीत आहेत.

### ठेव संकलन प्रतिनिधी :-

अहवाल सालात संस्थेमध्ये ९६८ दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधी व ५३ शिवसागर ठेव संकलन प्रतिनिधी काम करीत असून एकूण १०२१ ठेव संकलन प्रतिनिधी कार्यरत आहेत. संस्थेच्या व्यवसाय वाढ व प्रगतीमध्ये ठेव संकलन प्रतिनिधींचे मोलाचे योगदान आहे.

### संगणकीकरण / कोअर बँकींग :-

काळानुरुप तंत्रज्ञानात बदल होत असतात. त्याप्रमाणे कालसुसंगत बदल करणे आवश्यक आहे. बदलत्या तंत्रज्ञानाद्वारे संस्थेने नवनवीन बदल करुन तसेच तंत्रज्ञानाचे वाढते महत्त्व लक्षात घेवून आपली संस्था गेली अनेक वर्षे ग्राहकांना संगणकाद्वारे उत्कृष्ट सेवा देत आहे. त्यामुळे संस्थेच्या खातेदारांना तत्पर, अचूक व अद्ययावत माहिती उपलब्ध होत आहे. परिणामी, ग्राहकांचा संस्थेवरील विश्वास वृध्दिंगत झाला आहे. रिझर्व्ह बँकेने कोअर बँकींग ही प्रणाली सर्व बँकांना बंधनकारक केलेली आहे. त्याबाबत पतसंस्थांना अजून असे कोणते ही बंधन नसताना आपल्या संस्थेने सभासद, ग्राहक, ठेवीदार यांना तत्पर व अचूक सेवा देता यावी. संस्थेच्या सेवेचा दर्जा सुधारावा याकरीता कोअर बँकींग प्रणालीचा अवलंब केलेला आहे. संस्थेच्या सर्व शाखा कोअर बँकींग प्रणालीद्वारे जोडण्यात आलेल्या आहेत. नवनवीन आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करुन आपली संस्था देखील प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. महाराष्ट्रातील पहिली संगणकीकृत कामकाज करीत असणारी शिवकृपा, आज मोबाईल बँकींग सुविधेतही अग्रक्रमांवर आहे. शिवकृपाचे सर्व सन्माननीय सभासद / ग्राहक घरबसल्या **'शिवम पे'** मोबाईल ॲपद्वारे आपल्या खात्यावरील व्यवहार करीत आहेत. आय.एम.पी.एस. आर.टी.जी.एस. व एन.ई.एफ.टी, द्वारे फंड ट्रान्सफर, बी.बी.पी.एस. सुविधेद्वारे मोबाईल रिचार्ज, टी.व्ही. रिचार्ज, फास्ट टॅग, पाणी बिल, लाईट बिल, विमा हप्ता इत्यादी विविध प्रकारची बिले काही सेकंदात ऑनलाईन भरण्याच्या सुविधा शिवम पे ॲप मध्ये दिलेल्या आहेत.

संस्थेतील महत्त्वाची कागदपत्रे/दस्तऐवज आपत्कालीन परिस्थिती उद्‌भवल्यास डिजीटल स्वरुपामध्ये उपलब्ध व्हावी या दृष्टीने संस्थेने DMS (Document Management System Software) कार्यप्रणाली स्वीकारली असून दस्तऐवजाचे डिजिटायझेशन (Digitization) करण्याचे काम सुरु आहे.

### विपणन विभाग :-

संस्थेने नव्याने सुरु केलेल्या विपणन (Marketing) विभागाच्या माध्यमातून विविध माध्यमाद्वारे संस्थेची जाहिरात करण्यात येते आहे. तसेच सभासदांपर्यंत विविध ठेव व कर्ज योजनांची अद्ययावत माहिती पोहचविण्यासाठी व सुलभ कर्ज वसूलीसाठी, फोनद्वारे (Tele Marketing) ग्राहकांशी संपर्क साधला जात आहे. संस्थेच्या कार्यालयामध्ये विविध कर्ज योजना, ठेवी तसेच विविध उपक्रमांची माहिती ग्राहकांना व्हावी. यासाठी प्रत्येक शाखा कार्यालयामध्ये LED TV's (Digital Signage) स्क्रीन बसविलेल्या आहेत व त्यांचे नियंत्रण प्रशासकीय कार्यालयातून होत आहे. तसेच संस्थेची (Audio / Video) जाहिरात व्हावी या करीता नव्याने एलईडी स्क्रीन व्हॅनद्वारे जाहिरात केली जात आहे.

## संस्थेने अहवाल सालात केलेल्या दैदिप्यमान प्रगतीचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल पुढीलप्रमाणे

### १) सभासद :-

अहवाल सालाच्या सुरुवातीस एकूण ४,३२,८९९ सभासद होते. त्यामध्ये ३७,०६५ नवीन सभासदांची वाढ झाली. राजीनामे दिलेल्या व सभासदत्व संपूष्टात आलेल्या एकूण ५,७६० सभासदांची संख्या कमी झाल्यामुळे वर्ष अखेरीस संस्थेचे एकूण ४,६४,२०४ सभासद आहेत.

### २) भाग भांडवल :-

आपल्या संस्थेचे अधिकृत भाग भांडवल ₹ २५० कोटी असून, अहवाल सालाच्या सुरुवातीस ₹ १५३.६४ कोटी एवढे वसूल भाग भांडवल होते. अहवाल सालात भाग भांडवलामध्ये ₹ ९.२० कोटीने वाढ होऊन वर्ष अखेरीस संस्थेकडे एकूण वसूल भाग भांडवल रक्कम ₹ १६२.८४ कोटी झालेले आहे.

### ३) निधी :-

#### अ) गंगाजळी (राखीव निधी) :-

अहवाल सालाच्या सुरुवातीस गंगाजळीमध्ये ₹ ६६.३९ कोटी जमा होते. अहवाल सालात जमा झालेली प्रवेश फी व सन २०२०-२१ सालाचा लाभांश सभासदांनी घेऊन न गेल्यामुळे सहकार कायद्यानुसार तो गंगाजळीमध्ये वर्ग करण्यात आलेला असून अहवाल सालाच्या अखेरीस एकूण रक्कम ₹ ७४.८२ कोटी गंगाजळीमध्ये जमा आहेत.

#### ब) इमारत निधी :-

अहवाल सालाच्या सुरुवातीस इमारत निधीमध्ये ₹ ८१.६७ कोटी जमा होते. अहवाल सालामध्ये रक्कम ₹ २.२५ कोटीची वाढ झाल्याने वर्ष अखेरीस एकूण रक्कम ₹ ८३.९२ कोटी इमारत निधी मध्ये जमा आहेत.

#### क) अन्य निधी :-

अहवाल सालाच्या सुरुवातीस अन्य निधीमध्ये ₹ २०४.५८ कोटी जमा होते. अहवाल सालामध्ये ₹ १७.६१ कोटीने वाढ झाल्याने वर्ष अखेरीस एकूण ₹ २२२.१९ कोटी अन्य निधीमध्ये जमा आहेत.

## ४) गुंतवणूक :-

आपले उत्पन्न व नफा वाढविण्याच्या दृष्टीने संस्थेकडे उपलब्ध असलेल्या निधीचे योग्य नियोजन करुन गुंतवणूक करणे कामी संस्थेने विशेष लक्ष दिले आहे. कमीत कमी जोखीम व चांगली तरलता आणि सुयोग्य परतावा या मुख्य निकषांवर आधारीत गुंतवणूकीचे निर्णय घेतले आहेत. तसेच C.R.R. व S.L.R. चे विहीत प्रमाण राखले आहे. अहवाल सालाच्या सुरुवातीस अतिरिक्त व राखीव निधीची मुदत ठेवीपोटी विविध बँकामध्ये एकूण रक्कम ₹ ११४४.६९ कोटी गुंतवणूक केलेली होती. माहे मार्च २०२५ अखेर संस्थेची एकूण गुंतवणूक रक्कम ₹ ११६५.२१ कोटी एवढी आहे.

### -: प्रगती दर्शक तक्ता :-

(₹ कोटीत)

| अ. क्र. | तपशिल | सन | | | सन | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | २०२१-२२ | २०२२-२३ | २०२३-२४ | २०२४-२५ | वाढ/घट | टक्के |
| १ | सभासद (संख्या) | ३,६३,२५८ | ४,०२,१८६ | ४,३२,८९९ | ४,६४,२०४ | ३१३०५ | ७.२३ |
| २ | भाग भांडवल | १३८.०९ | १४८.२० | १५३.६४ | १६२.८४ | ९.२० | ५.९९ |
| ३ | निधी | | | | | | |
| | अ) राखीव निधी | ५३.३२ | ५८.९६ | ६६.३९ | ७४.८२ | ८.४३ | १२.७० |
| | ब) इमारत निधी | ७६.३२ | ७९.५३ | ८१.६७ | ८३.९२ | २.२५ | २.७५ |
| | क) अन्य निधी | १५५.०३ | १९०.२४ | २०४.५८ | २२२.१९ | १७.६१ | ८.६१ |
| ४ | गुंतवणूक | ८४०.९३ | १०५५.८७ | ११४४.६९ | ११६५.२१ | २०.५२ | १.७९ |

## ५) ठेवी :-

संस्थेच्या प्रगतीची घोडदौड कायम ठेवण्यासाठी संस्थेने वेगवेगळे उपक्रम आयोजित केलेले होते. तसेच संस्थेच्या विविध ठेव योजनांचा नियमितपणे आढावा घेण्यात आला. काळानुरुप वेळोवेळी व्याजदरात आवश्यक ते बदल करण्यात आले. अहवाल सालाच्या सुरुवातीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये ₹ २६५७.२४ कोटी जमा होते. अहवाल सालात ठेवीमध्ये ₹ २५१.३२ कोटीने वाढ झाल्यामुळे वर्ष अखेरीस संस्थेच्या विविध ठेवीमध्ये ₹ २९०८.५६ कोटी जमा आहेत. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालामध्ये ठेवीमध्ये वाढीचे शेकडा प्रमाण ९.४६% आहे.

## ६) कर्जे :-

वित्तिय संस्थांमधील वाढत्या स्पर्धेमुळे आर्थिक व्यवहार करण्यासाठी ग्राहकांसमोर अनेक पर्याय उपलब्ध आहेत. त्यामुळे खऱ्या अर्थाने आज ग्राहक राजा झालेला आहे. परिणामी कर्जाची मागणी कमी होत आहे. कर्जव्यवहार हा संस्थेच्या उत्पन्नाचा मुख्य स्त्रोत आहे. त्याअनुषंगाने बदलत्या काळानुसार व ग्राहकांच्या गरजा लक्षात घेवून संस्थेने विविध कर्ज योजना तयार केलेल्या आहेत. या योजनांचा लाभ बहूसंख्य सभासदांनी घेतला आहे.

अहवाल सालाच्या सुरुवातीस ₹ १९३२.४१ कोटी कर्ज येणे बाकी होते. अहवाल सालमध्ये संस्थेने सभासदांना ₹ ६००.२३ कोटी नव्याने कर्ज वाटप केले असून ₹ ३१५.६२ कोटी कर्ज वसूल झालेले आहे. वर्ष अखेरीस एकूण ₹ २२१७.०२ कोटी कर्ज येणे बाकी आहे. गतवर्षीच्या तुलनेत अहवाल सालामध्ये येणे कर्जामध्ये रक्कम ₹ २८४.६१ कोटी वाढ झाली आहे. त्याचे शेकडा प्रमाण १४.७३% आहे.

## ७) कर्ज थकबाकी व वसूली :-

मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था यांनी सन २००५-०६ पासून अनुत्पादक कर्जाचे (N.P.A.) निकष पतसंस्थांसाठी लागू केले आहेत. त्यामुळे संस्थेचा वसूली विभाग अनुत्पादक कर्जे कमी करण्यासाठी सतत पाठपुरावा करीत आहे. त्याचप्रमाणे संस्थेचे संचालक मंडळ व वसूली समिती वेळोवेळी कर्ज वसूलीची मोहिम राबवित आहे. संस्थेचे संचालक मंडळ, कर्ज वसूली समिती, कर्ज वसूली अधिकारी आणि कर्मचारी सातत्याने थकीत कर्जदार व त्यांच्या जामीनदारांशी संपर्क साधून कर्ज थकबाकीचे प्रमाण कमी करण्यासाठी प्रयत्न करीत आहेत. मार्च २०२४ अखेर येणे कर्जाशी थकबाकीचे शे. प्रमाण ८.३६% होते. गतवर्षीच्या तुलनेत कर्ज थकबाकीचे शे. प्रमाण १.३८% कमी होऊन ते ६.९८% इतके झाले आहे. थकीत कर्जदारांना नियमितपणे कर्ज वसूलीबाबत पत्रव्यवहार करण्यात येत आहे. यासाठी संस्थेचे सर्व कायदेविषयक सल्लागार वसूलीसाठी अत्यंत मोलाचे मार्गदर्शन करीत आहेत. त्यामुळे वसूलीच्या कामास गती आली आहे.

## ८) एन. पी. ए. :-

सहकारी पतसंस्थाना लागू असलेल्या एन.पी.ए.च्या निकषानुसार दि.३१ मार्च २०२५ अखेर येणे कर्जाशी निव्वळ एन.पी.ए. शे. प्रमाण ४.७९% आहे. गतवर्षीच्या तुलनेत एन.पी.ए.चे शे. प्रमाण ३.३४% टक्क्यांनी कमी करण्यात संस्थेला यश मिळाले आहे. संस्थेला एन.पी.ए. पोटी रक्कम ₹ ७९.८७ कोटी तरतूद करणे आवश्यक होते. मात्र ही तरतूद आपल्या संस्थेने रक्कम ₹ १२५.७९ कोटी केलेली आहे. आवश्यक तरतूदीपेक्षा रक्कम ₹ ४५.९२ कोटी अधिक तरतूद केली आहे. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षामध्ये नवीन एन.पी.ए. ची वाढ होऊ न देता प्रभावीपणे कर्ज वसूली करुन एन.पी.ए. चे शेकडा प्रमाण कमी राखण्याचे संस्थेने उद्दीष्ट ठेवले आहे.

## ९) संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे :-

अहवाल वर्षामध्ये संचालक व त्यांचे नातेवाईक यांना दिलेली कर्जे व वसूली याचा तपशिल पुढीलप्रमाणे.

(₹ लाखांत)

| अ. क्र. | तपशिल | ३१-०३-२४ | २०२४-२५ | | | | ३१-०३-२५ अखेर |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | अखेर येणे कर्ज | दिलेले कर्ज | एकूण वसूल कर्ज | अखेर येणे कर्ज | थकीत रक्कम | थकबाकीचे शे.प्रमाण |
| १ | संचालक | ८.२७ | - | ८.२७ | - | - | - |
| २ | नातेवाईक | ४.८३ | - | ०.५२ | ४.३१ | - | - |
| | **एकूण** | **१३.१०** | - | **८.७९** | **४.३१** | - | - |

## १०) नफा विभागणी :-

अहवाल सालात संस्थेस एकूण खर्च वजा जाता रक्कम ₹ ३५,२०,००,६४७.६४ नफा झालेला असून गतवर्षीचा शिल्लक नफा ₹ १,४०१.०० मिळून एकूण नफा रक्कम ₹ ३५,२०,०२,०४८.६४ आहे. सदर नफ्याची विभागणी पुढीलप्रमाणे करण्याची शिफारस संचालक मंडळ करीत आहे.

| | | |
|---|---|---|
| गंगाजळी २५ % | ₹ | ८,८०,००,१६१.९१ |
| लाभांश १० % | ₹ | १५,२६,०७,१६०.०० |
| संशयीत बुडीत कर्ज निधी | ₹ | ५,००,००,०००.०० |
| सहकार प्रशिक्षण निधी | ₹ | ५,००,०००.०० |
| कर्मचारी कल्याण निधी | ₹ | ५,००,०००.०० |
| निवडणूक निधी | ₹ | ५०,००,०००.०० |
| समाज कल्याण निधी | ₹ | ५,००,०००.०० |
| व्यवसाय वृध्दी निधी | ₹ | २,२५,००,०००.०० |
| सुवर्ण महोत्सव निधी | ₹ | ५,००,०००.०० |
| माहिती तंत्रज्ञान निधी | ₹ | २,६८,९३,२२५.७३ |
| क्रिडा व समारंभ निधी | ₹ | २५,००,०००.०० |
| देखभाल दुरुस्ती निधी | ₹ | २५,००,०००.०० |
| पुढील वर्षासाठी शिल्लक | ₹ | १,५०१.०० |
| **एकूण** | | **३५,२०,०२,०४८.६४** |

## ११) हिशोब तपासणी :-

### अ) अंतर्गत हिशोब तपासणी :-

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाची अंतर्गत हिशोब तपासणी **मे. तेजस मेटांगळे ॲण्ड कंपनी** यांनी केलेली असून त्यांनी संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

### ब) शासकीय लेखापरीक्षण :-

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे शासकीय लेखापरीक्षण सनदी लेखापाल **मे. अंबावत जैन ॲण्ड असोसिएट्स एलएलपी,** यांनी केले आहे. त्यांनी संस्थेस लेखापरीक्षण वर्ग **'अ'** दिलेला असून संस्थेच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त केले आहे.

## १२) श्रध्दांजली :-

अहवाल सालात संस्थेच्या नवी मुंबई विभागाचे विभागीय व्यवस्थापक श्री. बबन पवार यांच्या मातोश्री कै. लक्ष्मीबाई विठोबा पवार यांचे दि. २४ ऑक्टोंबर, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. सातारा विभागाचे विभागीय व्यवस्थापक श्री. संतोष देशमुख यांचे वडील कै. वसंतराव रामचंद्र देशमुख यांचे दि. २५ ऑक्टोबर, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. कोरेगांव शाखेतील दैनंदिन ठेव संकलन प्रतिनिधी श्री. अमोल अंकुश बाबर यांचे वडील कै. अंकुश शिवराम बाबर यांचे दि. ०७ नोव्हेंबर, २०२४ रोजी आकस्मित निधन झाले. सातारा शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. धोंडीराम माणिकराव शिंदे यांचे वडील कै. माणिकराव मारुती शिंदे यांचे दि. १७ डिसेंबर, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. कळवा शाखेचे ठेव संकलन प्रतिनिधी श्री. संजय आप्पासो जाधव यांचे वडील कै. आप्पासो सर्जेराव जाधव यांचे दि. २० डिसेंबर, २०२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. संस्थेच्या प्रशासकीय कार्यालयातील संगणक विभागातील अधिकारी श्री.आत्माराम शिवाजी चव्हाण यांच्या मातोश्री कै. मंगल शिवाजी चव्हाण यांचे दि. २२ डिसेंबर, २०२४ रोजी आकस्मित निधन झाले. ऐरोली शाखेचे शाखा व्यवस्थापक श्री. विकास बबन कोकाटे यांचे भाऊ कै. उत्तम बबन कोकाटे यांचे दि. २६ डिसेंबर, २०२४ रोजी आकस्मित निधन झाले. संस्थेचे माजी संचालक शिवाजी ऐवळे यांचे दि. २९ डिसेंबर, २०२४ रोजी आकस्मित निधन झाले.

या शिवाय अहवाल सालात संस्थेचे जे सभासद, ठेवीदार, हितचिंतक तसेच राष्ट्रीय किर्तीच्या ज्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या आत्म्यास चिरशांती लाभावी यासाठी शिवकृपा परिवाराच्या वतीने ईश्वरचरणी प्रार्थना !

## १३) आभार :-

संस्थेचे सन्माननीय सभासद, ग्राहक आणि खातेदार यांनी संस्थेच्या कामकाजात दिलेल्या सक्रिय सहकार्यामुळेच संस्थेला प्रगतीची वाटचाल करणे शक्य झाले आहे. अशा सर्व व्यक्तींचा संचालक मंडळाच्या वतीने मी प्रथमतः आभारी आहे.

संस्थेला वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य करणारे महाराष्ट्राचे मा. मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, सहकार मंत्री व विविध खात्यांचे मंत्री यांचे मनःस्वी आभार!

महाराष्ट्राचे मा. सहकार सचिव, सहकार आयुक्त व निबंधक, अप्पर निबंधक तसेच राज्यातील सर्व विभागीय सहनिबंधक, जिल्हा उपनिबंधक, सहाय्यक निबंधक त्याचप्रमाणे सहकार खात्याचे सर्व अधिकारी व कर्मचारी यांचेही आभार!

महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., महाराष्ट्र राज्य बिगर कृषी सहकारी पतसंस्था फेडरेशन लि., त्याच बरोबर राज्यातील सर्व जिल्हयातील सहकारी पतसंस्था फेडरेशनचे पदाधिकारी व संचालक यांचे मनःपूर्वक आभार !

मुंबई सहकारी बोर्ड त्याचप्रमाणे राज्याच्या सर्व जिल्हयातील सहकारी बोर्डाचे पदाधिकारी व संचालक यांचे मनःपूर्वक आभार!

सहकार चळवळीमध्ये दिपस्तंभाप्रमाणे दिशा दर्शक कामकाज करणारी शिवकृपा ही महाराष्ट्रातील आदर्श व अग्रगण्य पतसंस्था असून गुणात्मक दृष्ट्या प्रथम क्रमाकांवर आहे. संस्थेचे कर्मचारी व ठेव संकलन प्रतिनिधी यांनी समर्पित भावनेने दिलेल्या ग्राहक सेवेमुळेच प्रगतीच्या दिशेने वाटचाल करीत आहे. यांचा संचालक मंडळ कौतुकपूर्ण उल्लेख करु इच्छिते.

एकसंघ भावनेतून कार्यरत राहिले तरच स्वप्नवत कार्य देखील सिध्दीस जाते. या उक्तीनुसार संस्थेचे कामकाज सुरु आहे आणि यापुढे संस्थेची अशीच दैदिप्यमान पध्दतीने वाटचाल सुरु राहील. अडचणीवर मात करत त्यातून मार्ग काढणे ही आपली परंपरा आहे. ही परंपरा आपण कायम ठेवत आपल्या सामर्थ्याच्या व एकीच्या बळावर आपल्या दैदिप्यमान प्रगतीचा आलेख उंचावत ठेवू.

संस्थेच्या सर्वांगीण प्रगतीमध्ये सर्व आजी-माजी संचालकांच्या बहूमूल्य मार्गदर्शनाचा, सहकार्याचा आणि पाठिंब्याचा मोठा सहभाग आहे. त्याबद्दल त्यांचेही मनःपूर्वक आभार!

आपण देत असलेल्या सततच्या पाठिंब्यामुळे पुढील आर्थिक वर्ष पुन्हा एकदा सर्वांगीण प्रगतीचे असेल अशी संचालक मंडळाच्या वतीने ग्वाही देवून आपले सहकार्य असेच उत्तरोत्तर वृध्दिंगत व्हावे अशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो.

पुन्हा एकदा सर्व सभासद बंधु भगिनींचे आभार मानून अहवाल पूर्ण करीत आहे. धन्यवाद !

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !! जय सहकार !!!**

**श्री. गोरख तु. चव्हाण**
संस्थापक व अध्यक्ष



# दि. ३१ मार्च २०२५ अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन 2023-2024 ₹ पै. | EXPENDITURE / खर्च | ₹ पै. | सन 2024-2025 ₹ पै. |
|---|---|---|---|
| 166,56,27,898.16 | **INTEREST ON DEPOSIT / ठेवीवरील व्याज** | 182,24,52,046.19 | |
| | **INTEREST ON BORROWING / घेतलेल्या कर्जावरील व्याज** | | |
| 2,15,088.00 | 1. LOAN AGAINST FIXED DEPOSIT / अधिकर्ष कर्जावरील व्याज | 4,89,584.00 | 182,29,41,630.19 |
| | **SALARY & ALLOWANCE / पगार व भत्ते** | | |
| 36,32,62,780.00 | 1. STAFF SALARY / कर्मचारी पगार | 44,46,73,968.40 | |
| 2,76,39,834.00 | 2. EMPLOYER P.F.CONT. / संस्थेचे अंशदान भ.नि.निधी | 3,20,41,910.00 | |
| 11,73,580.00 | 3. P.F ADMIN EXP./ भ.नि.निधी वरील प्रशासकीय खर्च | 13,06,164.00 | |
| 2,94,97,904.00 | 4. BONUS PAYABLE / बोनस देय | 2,21,43,801.00 | |
| 2,00,18,982.00 | 5. GRATUITY & LEAVE ENCASHMENT / ग्रॅच्युईटी व रजा रोखीकरण | 1,55,55,190.00 | |
| 4,36,822.52 | 6. CONTRACTUAL & OUTSOURCING EXP./ कंत्राटी करार व आउटसोर्सिंग खर्च | 0.00 | 51,57,21,033.40 |
| 57,30,117.88 | **PRINTING & STATIONERY / छपाई व स्टेशनरी** | | |
| | PRINTING & STATIONERY / छपाई व स्टेशनरी | 1,32,66,634.58 | |
| | LESS STOCK OF STATIONERY / वजा छपाई साठा | 59,82,325.36 | 72,84,309.22 |
| | **ADMINISTRATIVE EXPENSES / प्रशासकीय खर्च** | | |
| 35,20,206.44 | 1. CONVEYANCE / प्रवास | 37,10,550.81 | |
| 13,80,961.20 | 2. ADVERTISEMENT / जाहिरात | 23,94,025.80 | |
| 26,23,241.70 | 3. POSTAGE / टपाल | 25,68,743.04 | |
| 22,36,10,150.33 | 4. AGENT COMMISSION / प्रतिनिधी कमिशन | 24,45,32,951.04 | |
| 1,83,10,208.00 | 5. OFFICE RENT / कार्यालयीन भाडे | 2,08,01,522.00 | |
| 1,53,54,069.65 | 6. ELECTRICITY / विद्युत | 1,74,54,175.90 | |
| 41,48,848.09 | 7. TELEPHONE / टेलिफोन | 47,01,487.43 | |
| 75,65,933.55 | 8. INSURANCE EXP. / विमा | 71,54,249.43 | |
| 47,74,500.00 | 9. AUDIT FEES / ऑडिट फी | 0.00 | |
| 41,14,255.08 | 10. TAXES / कर | 45,33,005.45 | |
| 1,68,53,537.00 | 11. NIYAMAK MANDAL CONT.EXP. / नियामक मंडळ अंशदान खर्च | 1,00,00,000.00 | 31,78,50,710.90 |
| | **OTHER EXPENSES / इतर खर्च** | | |
| 2,72,67,756.06 | 1. OFFICE REPAIRS & MAINTENANCE /कार्या. देखभाल व दुरुस्ती | 2,83,49,034.13 | |
| 5,180.00 | 2. NEWS PAPER / वर्तमानपत्र | 3,715.00 | |
| 14,93,356.48 | 3. XEROX / झेरॉक्स | 14,84,241.70 | |
| 7,97,147.00 | 4. POOJA / पूजा | 9,55,146.04 | |
| 56,93,224.50 | 5. INAUGURATION & FUNCTION / उद्घाटन व समारंभ | 40,89,331.33 | |
| 76,46,125.59 | 6. MISC. EXPS. / किरकोळ खर्च | 97,68,562.79 | |
| 16,30,884.48 | 7. PROFESSIONAL FEE / व्यवसायीक फी | 55,59,682.78 | |
| 3,31,416.27 | 8. LOCKERS RENT / लॉकर्स भाडे | 3,39,363.63 | |
| 12,61,881.44 | 9. TRAINING / प्रशिक्षण | 6,38,761.44 | |
| 11,01,761.00 | 10. WATER / पाणी | 13,03,007.00 | |
| **246,30,87,650.42** | **BALANCE C/F / पुढील पानावर .....** | | **266,37,97,683.71** |

# दि. ३१ मार्च २०२५ अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन 2023-2024 ₹ पै. | INCOME / उत्पन्न | ₹ पै. | सन 2024-2025 ₹ पै. |
|---|---|---|---|
| | **INTEREST RECEIVED / मिळालेले व्याज** | | |
| 226,99,42,085.44 | 1. ON LOAN / कर्जावरील | 242,10,09,443.00 | 242,10,09,443.00 |
| | **INTEREST & DIVIDEND RECEIVED/ मिळालेले व्याज व लाभांश** | | |
| 67,09,41,778.99 | 1. ON BANK DEPOSIT / बँक ठेवीवरील | 83,37,41,300.78 | |
| 76,028.08 | 2. ON MSEDCL DEPOSIT / एम.एस.ई.डी.सी.एल. ठेवीवरील | 72,923.00 | |
| 68,19,824.50 | 3. DIVIDEND ON PREFERENCE SHARES UNITY SMALL FINANCE BANK /प्राधान्य समभागांवरील लाभांश (युनिटी स्मॉल फायनान्स बँक) | 68,19,824.50 | |
| 3,980.00 | 4. DIVIDEND ON MDCC BANK SHARES / लाभांश एमडीसीसी बँक | 1,000.00 | 84,06,35,048.28 |
| | **OTHER INCOME / इतर जमा** | | |
| 3,85,12,030.92 | 1. SERVICE CHARGES / सेवा शुल्क | 3,82,50,540.10 | |
| 60,07,932.47 | 2. RECOVERY CHARGES / वसूली शुल्क | 77,76,151.39 | |
| 18,56,174.79 | 3. BANK CHARGES / बँक शुल्क | 24,37,893.73 | |
| 62,900.00 | 4. TENDER FEE / निविदा शुल्क | 1,24,000.00 | |
| 36,300.00 | 5. LOCKER RENT RECD. / लॉकर भाडे | 37,200.00 | |
| 28,27,310.89 | 6. STATIONERY CHARGES / स्टेशनरी चार्जेस | 49,12,814.06 | |
| 22,89,686.96 | 7. CHARGES FOR CIBIL REPORT / सिबील रिपोर्ट चार्जेस | 39,28,600.00 | |
| 6,58,529.50 | 8. PROFIT ON SALE OF ASSET / मालमत्ता विक्रीतून झालेला नफा | 22,12,269.27 | |
| 73,16,750.00 | 9. OFFICE RENT RECEIVED / ऑफिस भाडे | 81,42,592.48 | |
| 47,895.47 | 10. MSEDCL COMMISSION / एम.एस.ई.डी.सी.एल. कमीशन | 11,384.94 | |
| 930.09 | 11. BBPS COMMISSION / बी.बी.पी.एस कमीशन | 31.29 | |
| 6,317.60 | 12. MINI ATM COMMISSION / मिनी ए.टी.एम कमीशन | 0.00 | |
| 63,08,693.86 | 13. INSURANCE COMMISSION / विमा कमीशन | 53,25,900.27 | |
| 0.00 | 14. RECRUITMENT FEE RECEIVED / भरती शुल्क | 17,97,152.00 | |
| 0.00 | 15. INT RECD ON INCOME TAX / आयकर वरील व्याज | 1,02,64,977.65 | |
| 0.00 | 16. SERVICE CHARGE QR SOUND BOX / साउंड बॉक्स वरील सेवा शुल्क | 3,03,587.00 | |
| 0.00 | 17. SERVICE CHARGE QR SOUND BOX RENT/ साउंड बॉक्स भाडे सेवा शुल्क | 68,780.00 | 8,55,93,874.18 |
| 301,37,15,149.56 | **BALANCE C/F / पुढील पानावर .....** | | 334,72,38,365.46 |

# दि. ३१ मार्च २०२५ अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन 2023-2024 ₹ पै. | EXPENDITURE / खर्च | ₹ पै. | सन 2024-2025 ₹ पै. |
|---|---|---|---|
| 246,30,87,650.42 | **BALANCE B/F / मागील पानावरून** | | 266,37,97,683.71 |
| 5,05,566.00 | 11. INT.ON.EMP.HELP FUND / कर्मचारी सहाय्यता निधी व्याज | 5,89,080.00 | |
| 0.00 | 12. CIBIL CHARGES PAID / सिबील चार्जेस | 16,24,403.20 | |
| 2,86,000.00 | 13. LEGAL FEE / कायदेविषयक फी | 2,25,500.00 | |
| 38,135.58 | 14. STORAGE EXPS. / स्टोरेज खर्च | 0.00 | |
| 1,09,33,318.26 | 15. EXP. ON I.T. SERVICES / माहिती तंत्रज्ञानावरील खर्च | 1,30,79,668.31 | |
| 1,28,36,121.06 | 16. GST / वस्तु व सेवा कर | 1,65,12,411.84 | |
| 1,57,57,786.00 | 17. INCOME TAX / आयकर खाते | 1,37,10,298.00 | |
| 18,00,050.06 | 18. OFFICE RENOVATION EXP. W/OFF / कार्यालयीन सजावट खर्च निर्लेखित | 16,35,207.24 | |
| 14,63,029.54 | 19. UNIFORM / गणवेश | 15,53,813.04 | |
| 23,415.00 | 20. GOVT SECURITY CHARGES / शासकीय रोखे खरेदी विक्री चार्जेस | 15,436.64 | |
| 86,99,376.00 | 21. ELECTION EXP. / निवडणूक खर्च | 0.00 | |
| 6,34,288.81 | 22. BANK CHARGES / बँक चार्जेस | 21,66,330.75 | |
| 96,000.00 | 23. AMORTS OF PREM ON GOV. SECU. / शासकीय कर्ज रोखे | 20,000.00 | |
| 0.00 | 24. SPORT AND EVENT EXP. / क्रिडा व कार्यक्रम खर्च | 4,37,962.92 | 10,40,60,957.78 |
| | **MEETING EXPENSES / सभा खर्च** | | |
| 41,69,617.00 | 1. DIR.MTG.ALLOWANCES / संचालक सभा भत्ता | 53,16,416.00 | 53,16,416.00 |
| | **PROVISION FOR EXPENSES / खर्च तरतूदी** | | |
| 18,64,959.58 | 1. AGM EXPENSES / वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च तरतूद | 26,65,555.69 | 26,65,555.69 |
| 6,80,07,417.57 | **DEPRECIATION / घसारा** | 7,31,86,104.64 | 7,31,86,104.64 |
| | **PROVISION UNDER MCS ACT 1960 U/S 65**<br>**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ६५ खालील तरतूदी** | | |
| 2,50,00,000.00 | 1. PROV EXPENSES FOR BAD & DEBT. / बुडीत व संशयित कर्ज | 10,00,00,000.00 | |
| 2,18,00,000.00 | 2. PROV EXPS. FOR OVDU. INT RESER. / थकीत व्याज तरतूद | 4,30,70,000.00 | |
| 5,00,00,000.00 | 3. PROV. FOR INVEST. DEP. EXP. / गुंतवणूक घसारा तरतूद | 0.00 | |
| 10,00,000.00 | 4. PROV. FOR SHARE CAP.REDM.FUN / भाग भांडवल विमोचन तरतूद | 10,00,000.00 | |
| 31,71,500.0 | 5. PROV. AUDIT FEE EXPENSES / ऑडिट फी खर्च तरतूद | 21,40,000.00 | |
| 0.00 | 6. PROV EXPENSES FOR INVES.RBDD / बुडीत गुंतवणूक तरतूद | 1,000.00 | 14,62,11,000.00 |
| 32,25,40,918.68 | **NET PROFIT TRANSFER TO B/S**<br>**निव्वळ नफा ताळेबंद पत्रकास वर्ग** | 35,20,00,647.64 | 35,20,00,647.64 |
| **301,37,15,149.56** | **TOTAL / एकूण** | | **334,72,38,365.46** |

सदर तारखेच्या दिलेल्या स्वतंत्र अहवालाप्रमाणे

ठिकाण : मुंबई
दिनांक : ३१ जुलै २०२५

**मे. अंबावत जैन ॲण्ड असोसिएट्स एलएलपी**
फर्म रजि. क्र. १०९६८१W, पॅनल नं. १२५७५/ए-१
सनदी लेखापाल फर्म

**मे. तेजस मेटांगळे ॲण्ड कंपनी**
मेंबरशीप क्र. ६०२५४२, FRN -154974W
अंतर्गत हिशोब तपासणीस

## दि. ३१ मार्च २०२५ अखेरचे नफा-तोटा पत्रक

| सन 2023-2024 ₹ पै. | INCOME / उत्पन्न | ₹ पै. | सन 2024-2025 ₹ पै. |
|---|---|---|---|
| 301,37,15,149.56 | BALANCE B/F / मागील पानावरून | | 334,72,38,365.46 |
| 301,37,15,149.56 | TOTAL / एकूण | | 334,72,38,365.46 |

शिवकृपा सहकारी पतपेढी लि., मुंबई करीता

श्री. राजेश न. शेटे
मुख्य कार्यकारी अधिकारी
तथा कार्यलक्षी संचालक

श्री. चंद्रकांत श्री. वंजारी
संस्थापक व उपाध्यक्ष

श्री. गोरख तु. चव्हाण
संस्थापक व अध्यक्ष



# दि. ३१ मार्च २०२५ अखेरचे ताळेबंद पत्रक

| सन 2023-2024 ₹ पै. | CAPITAL & LIABILITIES / भांडवल व देणी | | सन 2024-2025 ₹ पै. |
|---|---|---|---|
| | **SHARE CAPITAL / भाग भांडवल** | | |
| 250,00,00,000.00 | **AUTHORISED SHARE CAPITAL / अधिकृत भाग भांडवल** | | 250,00,00,000.00 |
| 153,64,45,520.00 | **PAID UP SHARE CAPITAL / वसूल भाग भांडवल** | | 162,84,14,200.00 |
| | **RESERVE FUND & OTHER RESERVES / राखीव निधी व इतर निधी** | | |
| 66,38,88,027.24 | 1. RESERVE FUND / राखीव निधी | 74,82,31,708.24 | |
| 81,66,88,785.96 | 2. BUILDING FUND / इमारत निधी | 83,92,29,403.96 | |
| 87,42,21,194.50 | 3. RES. FOR B. & D. FUL DEBTS / बुडीत व संशयित कर्ज निधी | 114,96,08,778.18 | |
| 10,82,66,065.48 | 4. ADDITIONAL R.B.D.D / अतिरीक्त बुडीत व संश.कर्ज निधी | 10,82,66,065.48 | |
| 1,15,000.00 | 5. RES. R.B.D.D INVESTMENT / बुडीत व संश.निधी-गुंतवणूक | 1,16,000.00 | |
| 1,99,89,161.00 | 6. DIV. EQUALISATION FUND / लाभांश समतोल निधी | 1,99,86,961.00 | |
| 6,00,000.00 | 7. CHARITABLE FUND / धर्मादाय निधी | 6,00,000.00 | |
| 75,90,864.00 | 8. EMPLOYEES WELFARE FUND / कर्मचारी कल्याण निधी | 79,95,064.00 | |
| 1,55,50,850.00 | 9. CO-OP. EDUCATION FUND / सहकार प्रशिक्षण निधी | 1,60,50,850.00 | |
| 83,58,314.32 | 10. SOCIAL WELFARE FUND / समाजकल्याण निधी | 87,30,324.32 | |
| 23,52,65,550.00 | 11. CONTINGENCY FUND / आपत्कालीन निधी | 23,52,65,550.00 | |
| 0.00 | 12. ELECTION FUND / निवडणूक निधी | 50,00,000.00 | |
| 70,06,046.00 | 13. EMP. HELP FUND / कर्मचारी सहाय्यता निधी | 83,17,276.00 | |
| 10,13,72,982.00 | 14. RES. FOR STANDARD ASSETS / उत्पादित कर्ज निधी | 10,13,72,982.00 | |
| 47,32,568.00 | 15. GOLDEN JUBILEE CELE. FUND / सुवर्ण महोत्सव निधी | 52,32,568.00 | |
| 5,12,00,000.00 | 16. INFORMATION TECH. FUND / माहिती तंत्रज्ञान निधी | 7,62,00,000.00 | |
| 11,33,68,832.33 | 17. GENERAL RESERVE FUND / जनरल रिझ्र्व्ह निधी | 11,33,68,832.33 | |
| 4,29,43,963.40 | 18. RES. FOR OVERDUE INT / थकीत व्याज निधी | 4,30,89,039.40 | |
| 29,55,00,000.00 | 19. INVESTMENT. DEP. FUND / गुंतवणूक घसारा निधी | 17,05,00,000.00 | |
| 20,40,242.14 | 20. BUS. EXPANSION FUND / व्यवसाय वाढ निधी | 70,40,242.14 | |
| 2,40,12,648.47 | 21. NPA LOAN EXP. CHARGES / एन.पी.ए.कर्ज खर्च तरतूद | 2,71,58,400.47 | |
| 2,62,82,987.00 | 22. GRATUITY, LEAVE ENCASHMENT & SAL.ARREARS PAYABLE / ग्रॅच्युटी,लिव्ह एनकॅशमेन्ट आणि पगार थकबाकी देय | 2,62,82,987.00 | |
| 7,47,23,074.98 | 23. GENERAL FREE RESERVE FUND / जनरल फ्री रिझर्व्ह निधी | 7,81,24,151.88 | |
| 96,20,000.00 | 24. INVESTMENT FLUCTUATION FUND / गुंतवणूक चढ उतार निधी | 96,20,000.00 | |
| 30,00,000.00 | 25. SHARE CAPITAL REDMPTION FUND / भाग भांडवल विमोचन निधी | 40,00,000.00 | 380,93,87,184.40 |
| | **DEPOSITS / ठेवी** | | |
